सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
वर्ष - ४ थे | अंक - १२४ वा | अमरावती (महाराष्ट्र) | गुरुवार दि. २५ जून २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४

## नसरापूर खटला:आरोपी भीमराव कांबळे दोषी
## कोर्ट २९ जूनला सुनावणार अंतिम शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ पुणे–** संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या भोर तालुक्यातील नसरापूर चिमुकली अत्याचार आणि खून खटल्यात आज पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने ६५ वर्षीय आरोपी भीमराव कांबळेला दोषी ठरवले आहे. न्यायालयात दोन्ही बाजूंचा अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला असून, सरकारी वकिलांनी नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी केली.

न्यायालयाने हा गुन्हा 'अत्यंत दुर्मिळ आणि अमानवी' असल्याचे मान्य केले आहे. मात्र, नराधम भीमराव कांबळेला नेमकी कोणती शिक्षा दिली जाणार, याचा अंतिम फैसला आता सोमवार, २९ जून रोजी सुनावला जाणार आहे. त्यामुळे या क्रूरकर्म्याला फाशी मिळणार की जन्मठेप, यासाठी संपूर्ण महाराष्ट्राला आता २९ जूनची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

नसरापूर चिमुकली अत्याचार आणि खून खटल्यात आरोपीच्या शिक्षेवर कोर्टात अंतिम युक्तिवाद सुरू असताना विशेष न्यायालयाने अत्यंत कडक निरीक्षण नोंदवले आहे. हा गुन्हा अत्यंत दुर्मिळ, घृणास्पद आणि अमानवी आहे, अशा शब्दांत न्यायालयाने या कृत्याचा तीव्र निषेध केला. तर दुसरीकडे, सरकारी वकिलांनी नराधम भीमराव कांबळेच्या क्रूरतेचा पाढा वाचत, समाजात असा दाखला बसावा यासाठी त्याला केवळ आणि केवळ 'मृत्युदंडाची' (फाशीची)



शिक्षा देण्याची आक्रमक मागणी केली आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद संपला असून कोर्ट थोड्याच वेळात अंतिम शिक्षेची घोषणा करणार आहे.

**दोन कलमांनुसार फाशीची तरतूद; संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष**

न्यायालयाने स्पष्ट केले की, भीमराव कांबळेवर ज्या ज्या कलमांखाली खटला चालला, ते सर्व गुन्हे सिद्ध झाले आहेत. यातील दोन गुन्ह्यांमध्ये थेट 'फाशीच्या शिक्षेची' तरतूद आहे, एका गुन्ह्यात आजन्म जन्मठेप तर एका गुन्ह्यात १४ वर्षांच्या कारावासाची तरतूद आहे. यावेळी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल स्वतः न्यायालयात उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी अवघ्या १५ दिवसांत १२०० पानांचे आरोपपत्र दाखल करून ५५ हून अधिक साक्षीदार तपासले होते. राज्याच्या इतिहासत अवघ्या पावणेदोन महिन्यात निकाल लागणारा हा सर्वात वेगवान खटला ठरला असून आता न्यायालय काहीच वेळात त्याची अंतिम शिक्षा घोषित करणार आहे.

## आमचा एकही आमदार कुठेही जाणार नाही!
### ठाकरेंच्या ६ खासदारांची फूट आणि आत्रामांच्या दाव्यानंतर शरद पवारांचे बंडखोरीच्या चर्चेवर स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ पुणे –** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर' आणि बंडखोरीच्या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तब्बल ६ खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाल्यानंतर महाविकास आघाडीत खळबळ उडाली आहे. यातच राष्ट्रवादीचे नेते धर्मरावबाबा आत्राम यांनी शरद पवार गटाचेही खासदार फुटणार असल्याचा खळबळजनक दावा केला होता. या पार्श्वभूमीवर



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामतीत या सर्व चर्चांवर पहिल्यांदाच अत्यंत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. आमचा एकसुद्धा आमदार कुठे जाणार नाही, असा ठाम विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला आहे.

**विद्या प्रतिष्ठानच्या वाटेवर दिली प्रतिक्रिया –** शरद पवार हे आज बारामती दौऱ्यावर असून, ते 'विद्या प्रतिष्ठान' संकुलात आयोजित एका बैठकीसाठी जात होते. यावेळी त्यांच्या वाहनात त्यांच्यासोबत युगेंद्र पवार हेदेखील उपस्थित होते. विद्या प्रतिष्ठानकडे जात असताना वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधींनी त्यांना गाठले आणि सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर प्रश्न विचारला. ठाकरे गटाचे ६ खासदार फुटल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षातील आमदार आणि खासदारही फुटणार असल्याची जोरदार चर्चा आहे, यावर तुमचे काय म्हणणे आहे? असा थेट प्रश्न विचारण्यात आला. यावर क्षणाचाही विलंब न लावता शरद पवारांनी, आमचा एकसुद्धा आमदार कुठे जाणार नाही, असे सांगत पक्षातील फुटीच्या चर्चांना पूर्णविराम दिला.

**धर्मरावबाबा आत्रामांचा दावा काय होता?–** शरद पवारांच्या या प्रतिक्रियेला मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या एका विधानाची किनार आहे. नुकतेच धर्मरावबाबा आत्राम यांनी एक मोठे वक्तव्य करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. येत्या १२ डिसेंबरपूर्वी शरद पवार गटाचे तब्बल ५ खासदार फुटतील आणि ते आमच्याकडे येतील, असा दावा आत्राम यांनी केला होता. आत्रामांच्या या दाव्यानंतर आणि ठाकरे गटाच्या खासदारांच्या बंडखोरीनंतर शरद पवार गटही 'अलर्ट मोड'वर आल्याचे बोलले जात होते.

**महाविकास आघाडी 'अलर्ट मोड'वर–** शिवसेना ठाकरे गटात पडलेल्या या मोठ्या फुटीनंतर राज्यातील राजकारणात मोठे भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष सावध झाले असून, ते 'अलर्ट मोड'वर आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेसनेही आपल्या लोकप्रतिनिधींशी संवाद वाढवला असून, आगामी काळात राज्यात आणखी कोणत्या राजकीय घडामोडी घडतात, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

## सत्तेत जाताच मग्रुरी:फुटीर खासदार संजय दिना पाटील यांची पत्रकारांना धमकी
### म्हणाले– कॅमेरा बंद करा, नाहीतर मारून पाठवीन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. संजय दिना पाटील यांनी शिवसैनिकांना 'बॉम्ब टाकून, घरात घुसून मारण्याची' धमकी दिल्यावरून शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत आक्रमक झाले असून, त्यांनी पोलिस आयुक्तांकडे पाटलांच्या अटकेची मागणी केली आहे. मात्र, या प्रकरणावर जाब विचारणाऱ्या पत्रकारांवरच खासदार संजय दिना पाटील यांचा तोल सुटला. त्यांनी कॅमेऱ्यासमोर पत्रकारांना अत्यंत खालच्या पातळीची शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिली आहे.

खासदार संजय दिना पाटील यांनी नुकतेच एका मुलाखतीत 'माझ्या विरोधात आंदोलन केले तर बॉम्ब टाकेन' असे वादग्रस्त विधान केले होते. या विधानावर स्पष्टीकरण विचारण्यासाठी गेलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींवर पाटील संतापले.



त्यांनी कॅमेऱ्यासमोरच आपला तोल गमावला आणि पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. संतापाच्या भरात पाटील म्हणाले: अरे भाई, बस झालं ना आता! किती अति करताय? बंद करा कॅमेरा. मी खासदार आहे हे विसरून जाईन. इज्जत करतोय तर इज्जत राखा. उगाच माझ्या डोक्यात जाऊ नका. मी तुम्हाला घराखाली थांबवतोय, जेवायला देतोय, आणि तुम्ही असे वागताय. आता जर पुन्हा मला विचारायला आलात, तर मार खाणार. मारून पाठवीन तुम्हाला. लिहून घ्या, रेकॉर्ड करा आणि सांगा कमिशनरला. काय कम्प्लेंट करायची ती करा! सत्तेत आल्यावर एका विद्यमान खासदाराचा असा तोल ढळणे आणि थेट पत्रकारांना शिवीगाळ करत धमकावणे, यावरून आता तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## विदर्भाचा सिंचन अनुशेष जवळपास संपला?
### सरकारने विधानसभेत दिली मोठी माहिती!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आर्थिक सिंचन अनुशेष मार्च २०११ पर्यंत दूर झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाच्या आकडेवारीचा हवाला देत केला आहे. मात्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागांमध्ये भौतिक सिंचन अनुशेष अद्याप कायम असल्याचे त्यांनी मान्य केले. हा अनुशेष जून २०२७ पर्यंत पूर्णपणे दूर करण्याचा संकल्प राज्य सरकारने केला आहे.

विधानसभेत आमदार सुलभा खोडके, प्रवीण दटके, प्रताप अडसड, मोहन मते, विकास ठाकरे, विजय वडेट्टीवार, संजय मेश्राम, नाना पटोले, सुधीर मुनगंटीवार आदी सदस्यांच्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली.आमदारांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या पुनर्गठनाचा तसेच त्याचा प्रादेशिक संतुलनावर होणाऱ्या परिणामाचा मुद्दा



उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचन अनुशेष अनुक्रमे ९४ टक्के आणि ९९ टक्के दूर करण्यात आला आहे.

२०२५ अखेरपर्यंत विदर्भातील ७लाख ८४ हजार ७२० हेक्टर सिंचन अनुशेषापैकी ७ लाख ४१ हजार १८५ हेक्टर अनुशेष दूर करण्यात आला आहे. मात्र, अकोला जिल्ह्यात १४,५३० हेक्टर आणि बुलढाणा जिल्ह्यात २९,००५ हेक्टर अनुशेष अद्याप शिल्लक आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील ४ लाख ३० हजार ६४० हेक्टर अनुशेषापैकी ४ लाख २४ हजार ४४२ हेक्टर अनुशेष दूर करण्यात आला असून, केवळ हिंगोली जिल्ह्यात ६ हजार १९८ हेक्टर अनुशेष शिल्लक आहे.

## लोकप्रतिनिधींनी साथ सोडल्यावर उद्धव ठाकरेंना पदाधिकारी आठवले - योगेश कदम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** शिवसेनेची ताकद वाढणं म्हणजे महायुतीची ताकद वाढण्यासारखेच आहे, कारण आम्ही महायुतीमध्ये आहोत. शिवसेना आणि भाजपला आम्ही काही वेगळे पक्ष मानत नाही, आम्ही एकाच विचारधारेवर चालणारे दोन पक्ष आहोत, असे शिवसेना नेते योगेश कदम यांनी म्हटले आहे. ठाकरे गटातील सहाव्या खासदार शिंदे गटात येण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदत केल्याची माहिती आहे यावर बोलताना कदमांनी असे म्हटले आहे.

योगेश कदम म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. ते ज्या पद्धतीने संघटना चालवत आहेत ते सर्वांनी पाहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ते विधानसभेपेक्षाही जास्त फिरले आणि कार्यकर्त्यांची पाठिशी उभे राहिले हे देखील खूप महत्त्वाचे आहे.

योगेश कदम म्हणाले की, उद्धव ठाकरे हे सोडून गेलेल्या खासदारांच्या मतदारसंघात दौरा



करणार आहेत, तो केल्याने काही फरक पडेल असे मला वाटत नाही. धाराशिवमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक होती त्यावेळी उद्धव ठाकरे प्रचारासाठी का गेले नाही. त्या कार्यकर्त्यांना वाऱ्यावर का सोडले?

लोकप्रतिनिधींना साथ सोडल्यावर त्यांना स्थानिक पदाधिकारी आठवत आहेत, पण ते जेव्हा निवडणुकीला सामोरे जात होते त्यावेळी उद्धव ठाकरे का गेले नाही? असा सवाल कदम यांनी केला आहे. उद्धव ठाकरे केवळ सोयीचे राजकारण करणार का? हा प्रश्न उपस्थित होतोच ना.

## पुढील ४८ तासांत राज्यात पावसाचा जोर वाढणार
### पुणे, मराठवाडा आणि विदर्भासह २७ जुलैपर्यंत हवामान विभागाचा महत्त्वाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५पुणे–** यावर्षी जवळपास २० दिवस उशिरा आलेल्या मान्सूनने अखेर संपूर्ण महाराष्ट्रात दमदार एंट्री केली आहे. प्रशांत महासागरातील 'अल निनो'च्या प्रभावामुळे रेंगाळलेला मान्सून आता राज्यभरात सक्रिय झाला असून, पुढील ४८ तासांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने २७ जुलैपर्यंत राज्यासाठी महत्त्वाचे इशारे जारी केले आहेत. हवामान विभागाच्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सून २३ जून रोजी मुंबईसह महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओडिशामध्ये पुढे सरकला आहे.

कमी दाबाचा पट्टा सक्रिय



पश्चिमेकडील वारे सुमारे १.५ किलोमीटर उंचीपर्यंत मजबूत झाले असून उत्तर सोमालिया किनारपट्टीलगत कमी दाबाचा 'जेट प्रवाह' सक्रिय झाला आहे. यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून उत्तर अरबी समुद्र, गुजरात आणि छत्तीसगड-मध्य प्रदेशाच्या आणखी काही भागांत धडकण्याची शक्यता आहे.

**मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात पूरस्थिती–** राज्याच्या अनेक भागांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड आणि सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला. अनेक पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली असून, एक तरुण पुरात वाहून गेल्याचा व्हिडिओही व्हायरल होत आहे. जळगाव जिल्ह्यात रावेर आणि मुक्ताईनगर भागात पूरस्थिती निर्माण झाली. जळगाव शहरातील वाल्मीक नगर परिसरातील एका शाळेत आणि अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले. अमरावती शहरात अवघ्या दीड तासात तब्बल ९१.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## काँग्रेसचे धडाकेबाज नेते प्रकाश साबळे यांचा युवा स्वाभिमान पार्टीत प्रवेश
### शेकडो कार्यकर्त्यांसह पक्ष संघटनेला नवे बळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती :** युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने आयोजित भव्य जाहीर पक्षप्रवेश व पदग्रहण सोहळा अभियंता भवन, शेगाव नाका चौक येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात काँग्रेसचे धडाकेबाज नेते प्रकाश साबळे यांनी आपल्या १०० हून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह युवा स्वाभिमान पार्टीत जाहीर प्रवेश केला. तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासह विविध पक्षांतील सुमारे १५० हून अधिक कार्यकर्त्यांनीही पक्षात प्रवेश करून आमदार रवि राणा यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.यावेळी आमदार रवि राणा यांच्या हस्ते नवप्रवेशितांचे पक्षाचा दुपट्टा परिधान करून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजी व जल्लोषात हा सोहळा पार पडला. प्रकाश साबळे यांचा काँग्रेसमध्ये स्वाभिमान दुखावला गेल्याने त्यांनी युवा स्वाभिमान पार्टीत प्रवेश केल्याचे सांगण्यात आले.यावेळी बोलताना आमदार रवि राणा म्हणाले, प्रकाश साबळे यांच्यासारखे जनतेशी जिव्हाळ्याचे नाते जोडणारे आणि समाजसेवेसाठी झटणारे कार्यकर्ते पक्षाची खरी ताकद आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे पक्ष संघटना अधिक मजबूत होईल. तर प्रकाश साबळे यांनी, आमदार रवि राणा यांच्या जनहिताच्या कार्याने प्रेरित होऊन मी पक्षात प्रवेश केला असून युवा स्वाभिमान पार्टी



सामान्य कार्यकर्त्यांना सन्मान व न्याय देणारी संघटना आहे, असे सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करताना रवि राणा यांनी भाजप हा आमचा मोठा भाऊ असून युवा स्वाभिमान पार्टी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वासोबत ठामपणे उभी असल्याचे सांगितले. तसेच विधान परिषद निवडणुकीतील कामगिरीवरून काँग्रेसवरही त्यांनी टीका केली.या सोहळ्यात पक्ष संघटना बळकट करण्यासाठी विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. प्रकाश साबळे यांची जिल्हाध्यक्ष, सोनाली नवले यांची महिला जिल्हाध्यक्षा, संजय भारसाकडे यांची दर्यापूर विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. याशिवाय जिल्हा, तालुका व शहर स्तरावरील अनेक पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या.कार्यक्रमाला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, सागर देशमुख महाराज, सुनिल राणा, जयंत वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, कमलकिशोर मालानी यांच्यासह अनेक मान्यवर व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. युवा स्वाभिमान पार्टी आगामी निवडणुकांमध्ये अधिक ताकदीने मैदानात उतरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संपादकीय ......

# 'बूंद से गई वो हौद से नहीं आती'

*गानसम्राज्ञी आशा भोसले यांच्या निधनाचा शोक प्रस्ताव महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृहात मांडण्यात आला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी यावेळी मराठी भाषेचे जे प्रदर्शन केले त्यावरून सध्या जी राळ उठली त्यात काहीही अतिशयोक्ती नाही. महाराष्ट्राची प्रथम भाषा मराठी आहे. याच सरकारने रिक्षा, टॅक्सीवाल्यांनाही मराठी सक्तीची केली आहे. राज्यात पहिलीपासून मराठी शिकवली जाण्याचा आग्रह धरला जातो, त्याच राज्याच्या सर्वोच्च सभागृहातील प्रमुख - विधानसभाध्यक्ष यांची मराठी जर समजण्यापलिकडची असेल तर त्यांची गय करण्याचे काहीही कारण नाही. दोन दिवसांनंतर राहुल नार्वेकरांना त्यांच्या चुकीची जाणीव झाली. त्यांनी तिसर्या दिवशी सभागृहाच्या सुरुवातीलाच मराठीच्या चुकीच्या उच्चारांसाठी, चुकीच्या शब्दप्रयोगांसाठी आणि गानसम्राज्ञी आशा भोसले यांच्या वडिलांचेही नाव चुकीचे घेतले गेले, या जवळपास २५-३० चुकांबद्दल जाहीर दिलगिरी व्यक्त केली. या दिलगिरीचा स्वीकार महाराष्ट्राने मोठ्या मनाने केला. पण 'बूंद से गई वो हौद से नहीं आती', हेही सरकारने लक्षात घेतले पाहिजे. या दिलगिरीवेळीही त्यांनी जी दर्पोक्ती केली, मी चार - साडेचार वर्षे सभागृहात काम करत आहे. मराठीतच करत आहे. वाचनात झालेली चूक ही माझी नसून बारीक आणि अस्पष्ट फाँटमुळे हे घडले, अशी तांत्रिक बाब त्यात घुसवली. त्यामुळे त्यांची दिलगिरी देखील मराठीवरती आभार करणारीच अधिक म्हणावी लागेल.*

*गेल्या चार-साडेचार वर्षांत अध्यक्षांनी जागतिक किर्तीचे काम केले हेही नाकारता येणार नाही. दोन पक्षांच्या फुटीमध्ये नार्वेकरांची भूमिका ही सर्वात मोठी राहिली. सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रतेचा निर्णय अध्यक्षांच्या विवेकावर सोडला, तेव्हा नार्वेकरांनी अपात्रतेच्या याचिकेवर निर्णय घेण्यासाठी लावलेला वेळ हा सरन्यायाधिशांनाही संताप आणणारा होता. अखेर त्यांना रिॲलिस्टिक वेळापत्रक सादर करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाला द्यावे लागले. त्यानंतर अध्यक्षांनी 'निष्पक्ष' निर्णय देत खरी शिवसेना कोणाला दिली आणि दोन्ही गटांचे आमदार कसे पात्र ठरवले हे महाराष्ट्रानेच नाही तर जगाने पाहिले. आता या निर्णयाचे भिजत घोंगडे सर्वोच्च न्यायालयात पडून आहे. यावेळी अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाचे ड्राफ्टिंग खरोखर त्यांनीच केले होते का, याबद्दलही शंका उपस्थित करण्यात आली होती.*

*विधिमंडळ अधिवेशनाला सुरुवात होऊन दोन दिवस फक्त झाले आहेत. त्यामध्ये सभागृहात सत्ताधारी अध्यक्षांचे ऐकत नसल्याचे समोर आले. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या दोन दिवसांत नार्वेकरांना त्यांच्या अधिकारांचा वापर करण्याचे वारंवार अवाहन केले. अध्यक्षांचा सत्ताधारी सदस्यांकडून भर सभागृहात मान राखला जात नसल्याचे ज्येष्ठ विरोधी सदस्य सांगत आहेत. मात्र या सर्वांकडे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कानाडोळा करून सत्ताधार्यांना काहीही बोलण्याची धमक दाखवताना दिसत नाहीत.*

*राज्याच्या या सर्वोच्च सभागृहात अध्यक्षांची मोठी परंपरा राहिली आहे. गणेश माळवणकर हे विधानसभेचे अध्यक्ष होते. नंतर ते देशाचे सर्वोच्च सभागृह लोकसभेचे पहिले अध्यक्ष झाले. राहुल नार्वेकर ज्या अलिबागमधून येतात त्या अलिबागचे दत्तात्रय कुंटे विधानसभेचे अध्यक्ष होते. नार्वेकर ज्या चार-साडेचार वर्षांचा हवाला देतात त्या तुलनेत १० वर्षे या पदावर राहिलेले बाळासाहेब भारदे होते. ज्यांनी महाराष्ट्राच्या संसदीय परंपरेचा पाया घातला. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्यासारख्या खंबीर मुख्यमंत्र्यांच्या काळातही त्यांनी विरोधी पक्षाला सभागृहात पूर्ण संरक्षण दिले. बॅरिस्टर शरद दिघे हे कायद्याचे जाणकार आणि शिस्तप्रिय अध्यक्ष म्हणून त्यांची ओळख होती. थेट मुख्यमंत्र्यांना आणि मंत्र्यांना सभागृहाची माफी मागण्यास त्यांनी भाग पाडले होते. यावरून त्यांच्या कडक शिस्तीचा आणि कायद्याच्या अभ्यासाचा आवाका लक्षात येतो. गांधीवादी विचारसरणीचे मधुकरराव चौधरी, विरोधी पक्षालाही दुय्यम वागणूक न देणारे अरुण गुजराथी आणि आजही सभागृहात असलेले शांत संयमी पण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणारे दिलीप वळसे-पाटील अशी अध्यक्षांची मोठी परंपरा राहिली आहे. त्यांच्या कार्य कर्तृत्त्वाचा अभ्यास विद्यमान अध्यक्ष, उपाध्यक्षांनी एकदा ग्रंथालयात बसून केला पाहिजे.*

*कोणीही यावे आणि टपली मारून जावे, असे हे पद नक्कीच नाही. याची शान या पदावरील व्यक्तीच्या वागण्या, बोलण्यातून आणि निर्णयातून झळकत असते, तसा कारभार आतापर्यंतच्या अध्यक्षांनी निर्माण करून ठेवला आहे. नाही तर ज्याप्रमाणे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अधिवेशनकाळात त्यांच्या खात्याची उत्तरे देण्यासाठी हंगामी मंत्री नेमले आहेत, तसेच मराठीतील प्रस्ताव वाचण्याची सक्ती अध्यक्षांना न करता उपाध्यक्षांनी तो वाचला तरी चालेल, त्यांना जमत नसेल तर तालिकाध्यक्षांना तात्पुरत्या स्वरुपात ती जबाबदारी द्यावी. तेही योग्य ठरत नसेल तर हंगामी मंत्र्यांची परंपरा निर्माण झाली आहेच. मात्र हे सरकार असे काहीही करणार नाही.*

*एखाद्यावर जबाबदारी निश्चित करून त्याला उत्तरदायी ठरवण्याचे सौजन्य या सरकारने सोडून दिलेले आहे. त्यामुळे अशा परिवर्तनाचा प्रश्नच येत नाही. राहिला प्रश्न सभागृहातील कामकाजाचा, तर सत्ताधारी आमदारच सभागृहात एकमेकांविरोधात बाह्या सरसावतात तेव्हाही सभागृहाचे प्रमुख कोणताही निर्णय देत नाही. सत्ताधारी मंत्री, आमदार अध्यक्षांच्या निर्देशांकडे सपशेल दुर्लक्ष करतात, ते डावलून कामकाज चालवण्याचा प्रयत्न होतो. कोणत्याही विषयावर लक्षवेधीचा आग्रह सदस्य धरतात आणि अध्यक्षांना तो निमूटपणे मान्य करावा लागतो, अशा तंत्राला लोकतंत्र म्हणण्याची मजबूरी जनतेवर आलेली आहे.*

# शिक्षक मतदारसंघ निवडणूक- २०२६ करीता काँग्रेस निर्णायक भूमिका घेणार का ?



विभागातील काँग्रेस पक्षासाठी-२०२६ ची शिक्षक मतदारसंघ निवडणूक ही केवळ विधान परिषदेची निवडणूक नसून पक्षाच्या भवितव्याची कसोटी ठरणार आहे. एकेकाळी ग्रामीण ते शहरी भागात भक्कम जनाधार असलेल्या काँग्रेसला गेल्या काही वर्षांत सलग पराभव, संघटनात्मक दुर्बलता आणि अंतर्गत गटबाजीचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे पक्षाच्या राजकीय अस्तित्वाबाबत आणि भविष्यातील वाटचालीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते. हा विजय काँग्रेसच्या पुनरागमनाची नांदी ठरेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकांतील अपयशाने त्या आशांवर पाणी फेरले. परिणामी, काँग्रेससमोर आता केवळ निवडणूक जिंकण्याचेच नव्हे, तर आपली हरवलेली विश्वासार्हता आणि संघटनात्मक ताकद पुन्हा उभारण्याचे मोठे आव्हान उभे आहे.पक्षाच्या वारंवार होणाऱ्या पराभवामागे केवळ विरोधकांची ताकद कारणीभूत नाही. त्यामागे काँग्रेसमधील अंतर्गत वास्तवही तितकेच जबाबदार आहे. शहर विरुद्ध ग्रामीण, गट विरुद्ध गट आणि नेते विरुद्ध नेते अशा संघर्षांमध्ये पक्षाची ऊर्जा खर्च होत आहे. संघटन वाढविण्याऐवजी अंतर्गत वादांमध्ये अडकलेल्या काँग्रेसमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि निराशा वाढत आहे. शहर काँग्रेसला ग्रामीण काँग्रेस चालत नाही आणि ग्रामीण काँग्रेसला शहर काँग्रेस चालत नाही अशी भावना तळागाळात निर्माण होणे ही पक्षासाठी धोक्याची घंटा आहे.१८ जून २०२६ रोजी झालेल्या विधान परिषद निवडणुकीदरम्यान काही लोकप्रतिनिधींनी पक्षाच्या अधिकृत भूमिकेविरोधात मतदान केल्याचे आरोप झाले. हे आरोप सत्य असतील तर ते काँग्रेसमधील संघटनात्मक शिस्त आणि बांधिलकी किती कमकुवत झाली आहे, याचे स्पष्ट द्योतक आहे. अशा घटनांबाबत पक्षाने वेळेवर आणि ठाम भूमिका घेतली नाही तर कार्यकर्ते आणि जनतेमध्ये चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे.संघटनात्मक नियुक्त्यांबाबतही अनेक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे. पक्ष काही मोजक्या व्यक्तींभोवती केंद्रित झाल्याची भावना वाढत आहे. नव्या नेतृत्वाला संधी मिळत नसल्याने तरुण कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे, तर वर्षानुवर्षे पक्षासाठी संघर्ष करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना अधिक तीव्र झाली आहे.अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये होणारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक काँग्रेससाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे. ही निवडणूक केवळ एक जागा जिंकण्याची लढाई नाही; ती काँग्रेसच्या राजकीय पुनरुज्जीवनाची आणि हरवलेली प्रतिष्ठा परत मिळवण्याची सुवर्णसंधी आहे. गेल्या



**समीर जवंजाळ**
माजी सचिव, युवक कांग्रेस, महाराष्ट्र राज्य
९९२२० ३७७१५

काही निवडणुकांतील पराभवाची धूळ झटकून नव्याने उभे राहण्यासाठी हा मतदारसंघ महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.मात्र त्यासाठी सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो उमेदवार निवडीचा आहे. काँग्रेस पुन्हा एखाद्या आयात उमेदवारावर विश्वास ठेवणार का? विविध पक्षांमध्ये वारंवार पक्षांतर करणारे, शैक्षणिक क्षेत्राशी थेट संबंध नसलेले किंवा केवळ आर्थिक ताकदीच्या जोरावर राजकारण करणारे चेहरे पुढे करून पक्षाला दीर्घकालीन फायदा होण्याची शक्यता कमी आहे. अशा प्रयोगांचे परिणाम काँग्रेसने यापूर्वीही अनुभवले आहेत.शिक्षक मतदारसंघाचे स्वरूप इतर निवडणुकांपेक्षा वेगळे आहे. येथे मतदार सुशिक्षित, जागरूक आणि प्रश्न विचारणारे आहेत. त्यामुळे पैसा, प्रसिद्धी किंवा राजकीय समीकरणांपेक्षा शिक्षकांच्या प्रश्नांची जाण, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य, वैचारिक स्पष्टता, सामाजिक स्वीकार्यता आणि नेतृत्व क्षमता अधिक महत्त्वाची ठरते.आज काँग्रेसला केवळ निवडणूक जिंकणारा उमेदवार तर हवा आहेच, पण सोबतच भविष्यात पक्ष उभारू शकणारे नेतृत्व हवे आहे. असे नेतृत्व जे निवडून आल्यानंतरही शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, युवक आणि समाजातील विविध घटकांना जोडून ठेवेल. पक्षाशी निष्ठा असलेले, संघर्षातून पुढे आलेले आणि संघटनात्मक क्षमता सिद्ध केलेले नेतृत्वच काँग्रेससाठी अधिक उपयुक्त ठरू शकते.विशेष म्हणजे या निवडणुकीसाठी आता अवघे चार महिने शिल्लक आहेत. त्यामुळे काँग्रेसने आतापासूनच शिक्षक मेळावे, संवाद सभा, शिक्षण परिषद आणि विविध शिक्षक संघटनांशी चर्चा सुरू करणे आवश्यक आहे. समविचारी संघटना आणि गटांशी संवाद साधून व्यापक सहमती निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर नव्हे, तर त्यापूर्वीच वातावरणनिर्मिती करण्याची गरज आहे. कारण ही निवडणूक केवळ एका उमेदवाराची नसून काँग्रेसच्या भवितव्याची निवडणूक आहे. त्यासाठी नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा वेळ आली आहे त्यासाठी काँग्रेस भूमिका घेणार का ?

## आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल ऋषिकेश शर्मा यांच्याकडून अभिनंदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपाचे उमेदवार आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी मिळविलेल्या दणदणीत व ऐतिहासिक विजयाबद्दल भाजपा राजस्थान प्रकोष्ठ सेल, अमरावती शहराचे अध्यक्ष ऋषिकेश अनिल शर्मा यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ऋषिकेश शर्मा यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सलग तिसऱ्यांदा विधान परिषद निवडणुकीत विजय मिळवून नवा इतिहास रचला आहे. तसेच सलग दुसऱ्यांदा क्लीन स्वीप करत ४२१ वैध मतांपैकी तब्बल ३९० मते मिळवून त्यांनी मतदारांचा प्रचंड विश्वास संपादन केला आहे.ते पुढे म्हणाले की, आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी महाराष्ट्र शासनात राज्यमंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्य करताना जिल्ह्याच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामांना गती मिळाली असून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे.ही विजयश्री पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाच्या विकासाभिमुख व जनकल्याणकारी धोरणांवर जनतेने व्यक्त केलेला विश्वास असल्याचेही ऋषिकेश शर्मा यांनी नमूद केले. आगामी काळातही आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अमरावती जिल्ह्याच्या विकासाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी

# ई-पीक पाहणीसाठी आता बांधावर येणार सरकारी कर्मचारी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५ अमरावती**

सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना आता स्वतः धावपळ करण्याची गरज भासणार नाही. गेल्या काही वर्षांपासून ई-पीक पाहणी प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि त्याला मिळालेला मर्यादित प्रतिसाद लक्षात घेऊन राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यंदापासून ई-पीक पाहणीचे काम तहसील स्तरावर नियुक्त करण्यात येणाऱ्या विशेष सहायकांमार्फत केले जाणार असून, १५ जुलैपासून राज्यभर ही मोहीम सुरू होणार आहे.यापूर्वी शेतकऱ्यांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून स्वतः पिकांची नोंदणी करावी लागत होती. मात्र, ग्रामीण भागात स्मार्टफोनची कमतरता, मोबाईल नेटवर्कच्या समस्या तसेच तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे अनेक शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहत होते. आता तहसीलदारांकडून नियुक्त करण्यात आलेले सहायक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची अधिकृत नोंद करतील.



### काय आहे ई-पीक पाहणी?

ई-पीक पाहणी ही डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित शासकीय व्यवस्था असून, तिच्या माध्यमातून शेतातील पिकांची नोंद थेट सातबारा उताऱ्यावर केली जाते. यामुळे पीक पद्धतीची अचूक माहिती उपलब्ध होते आणि विविध शासकीय योजनांचा लाभ देताना पारदर्शकता वाढते.महिला बचतगटांचीही होणार मदत या मोहिमेला गती देण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी महिला बचतगटांतील सदस्यांची मदत घेतली जाणार आहे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन पीक पाहणीच्या कामात सहभागी करून घेतले जाईल.अंतराच्या नियमात शिथिलता पूर्वी पीक पाहणी करताना शेताच्या मध्यभागी जाऊन माहिती नोंदवावी लागत होती. आता या नियमात शिथिलता आणण्यात आली असून, २० मीटर अंतराच्या मर्यादेतूनही पीक पाहणी करता येणार आहे.मोबाईलवर मिळणार पुष्टी संदेश ही संपूर्ण प्रक्रिया केंद्र सरकारच्या 'ॲग्रिस्टॅक' डिजिटल कृषी व्यवस्थेशी जोडली जात आहे. त्यामुळे पीक पाहणी पूर्ण झाल्यानंतर त्याची माहिती आणि पुष्टीकरणाचा संदेश थेट शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पाठविण्यात येणार आहे.तांत्रिक अडचणींमुळे येत होत्या समस्या वारंवार सर्व्हर डाऊन होणे, अक्षांश-रेखांश अचूक न मिळाल्याने फोटो अपलोड न होणे, तांत्रिक गुंतागुंत किंवा माहितीअभावी चुकीच्या नोंदी होण्याचा धोका अशा विविध अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत होते.शेतकऱ्यांचा त्रास कमी करणे आणि सातबारावरील पिकांची ऑनलाइन नोंद अचूकपणे करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. १५ जुलैपासून सुरू होणाऱ्या या मोहिमेत शेतकऱ्यांनी नियुक्त सहायकांना सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव यांनी केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २१ ते २३ जुलै दरम्यान तीन दिवसीय 'महाराजस्व अभियान'

**विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरात २१, २२ आणि २३ जुलै रोजी 'महाराजस्व अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने घेण्यात आला आहे. या महाअभियानाच्या माध्यमातून राज्यातील तब्बल ५० लाख कुटुंबांपर्यंत शासकीय सेवा आणि विविध योजनांचे लाभ थेट पोहोचविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व



अभियानाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत सहाही विभागांचे विभागीय आयुक्त, महाराजस्व अभियान अंमलबजावणी समितीचे प्रमुख विक्रांत पाटील, सदस्य नीलम गोऱ्हे, मनिषा कायंदे आदी उपस्थित होते.

# पावसाने दगा फटका केल्यास अमरावतीत दोन दिवसांआड पाणीपुरवठ्याची तयारी; 'एल निनो'च्या संकटाने प्रशासन सतर्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

गेल्या काही दिवसांपासून जाणवणाऱ्या तीव्र तापमानामुळे अमरावती शहरात पाण्याचा वापर प्रचंड्र वाढला असून, पाणीपुरवठा यंत्रणेवर कमालीचा ताण निर्माण झाला आहे. सध्या मानसून अमरावती शहरात दखल जला असला तरी 'एल निनो'चे गडद संकट पाहता, संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी आता शहरात दोन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन प्रशासनाकडून सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर, पाणी नियोजनाचा अंतिम आराखडा तयार करण्यासाठी मंगळवारी महापालिकेत विविध यंत्रणांची



एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.जून महिना सरत आला तरी तापमानातील वाढ कायम आहे. यामुळे अमरावतीकरांचे कुलर अद्यापही पूर्ण क्षमतेने सुरूच आहेत. कुलर आणि इतर कारणांमुळे पाण्याचा उपसा वाढल्याने जलशुद्धीकरण केंद्रातून भरलेल्या राक्या काही तासांतच रिकाम्या होत आहेत.सहाः स्थिती पाहता नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. वाहने धुणे, अंगणात पाणी मारणे यासारख्या कार्मासाठी पाण्याचा अपव्यय त्वरित टाळावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अंतर्गत नियोजन सुरू केले आहे. परिस्थिती नियंत्रणात आली नाही, तर शहरात अधिकृतपणे दोन दिवसांआड पाणी देण्याची पाळी येऊ शकते. अप्पर वर्धा धरणात सध्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे, त्यामुळे शहरात पाण्याचा कोणताही तत्कालिक प्रश्न नाही. मात्र, तरीही पाण्याचे संवर्धन करणे आणि ते वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.

अमरावती शहराची तहान भागवणाऱ्या मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणातील पाणीसाठ्याची स्थिती समाधानकारक असली, तरी भविष्यातील संकट टाळण्यासाठी सरकार सतर्क झाले आहे.सध्याचा साठा : धरणात सध्या ३४४ दशलक्ष घनमीटर पाणी शिल्लक आहे.

चिंतेचे कारण नाही, तरीही कपात: हा पाणीसाठा अमरावती शहराला पुढील ५ ते ६ वर्षे पुरेल एवढा प्रचंड आहे.

### शासनाने मागवली माहिती

'एल निनोच्या प्रभावामुळे राज्य शासनाने राज्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्याची सविस्तर माहिती मागवली आहे.

मंत्रालयातून आढावा'अल निनोचे गडद संकट आणि वाढत्या तापमानामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची राज्य सरकारने दखल घेतली आहे. नगर परिषद प्रशासनाच्या संचालकांनी मंगळवारी थेट मंत्रालयातून व्हिसीद्वारे मनपाच्या पाणीसाठ्याचा आणि नियोजनाचा आढावा घेतला. या बैठकीत आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील सहास्थिती आणि पाणीसाठ्याची सविस्तर माहिती शासनाला सादर केली. शहरात नवकरच दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला जाऊ शकतो, असे अधिकृतपणे राज्य शासनाला कळविले आहे.

आम्ही तीन दिवसांचे पाणी एकाच दिवशी देऊ, परंतु नागरिकांनीही ते पाणी पुढील तीन दिवस पुरवून वापरणे आवश्यक आहे. संभाव्य संकट टाळण्यासाठी प्रशासनाने जल नियोजनाच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब काटकसरीने वापरावा.

– **संजय लेव्हरकर**, उपविभागीय अभियंता, मजीप्रा.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जिल्ह्यातील १० महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी, चार घरांचे नुकसान

## वीज पडून एका गायीचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती–** अमरावती जिल्ह्यात मान्सूननेदमदार आगमन करत मंगळवार, २३ जून आणि बुधवार २४ जून रोजी सायंकाळी जोरदार मुसळधार पावसाची हजेरी लावली. जिल्ह्यात १० महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली असून चार घरांचे नुकसान झाले आहे. याशिवाय विज पडून एका गायीचा मृत्यू झाल्याची घटना चिखलदरा तालुक्यात घडली. तीन महसूल मंडळांत १०० मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद घेण्यात आली आहे.जिल्ह्यात सरासरी ३९.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असला तरी काही ठिकाणी घरांचे व पशुधनाचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. धारणीत १२९ मिमी पावसाची नोंद झाली. याशिवाय नांदगाव खंडेश्वर येथे ११८.५ मिमी, मंगरुळ ११३.२५ मिमी, शिवनी येथे ९९.२५ मिमी, माहूली येथे ९५ मिमी, अमरावती येथे ७२.५ मिमी तर बडनेरा येथे ६८.७५ मिमी पाऊस झाला. अतिवृष्टीमुळे धारणी व भातकुली तालुक्यात एकूण चार घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. धारणी तालुक्यात एका तर भातकुली तालुक्यात तीन घरांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. तसेच चिखलदरा तालुक्यात वीज पडून एका गायीचा मृत्यू झाला आहे. सुदैवाने या पावसामुळे जिल्ह्यात कोणतीही जीवितहानी अथवा मानवी जखमीची घटना घडलेली नाही. तसेच शेतीपिकांचे नुकसान झाल्याची नोंद अद्याप प्राप्त असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> **तीन मंडळांत १०० मिमीपेक्षा अधिक पाऊस**
>
> **जिल्ह्यात मान्सूनचा जोरदार धडाका**

# मुसळधार पावसानंतर मनपाची तात्काळ धाव

# आयुक्त व महापौरांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

बुधवारी शहरात झालेल्या मुसळधार पावसानंतर विविध भागांमध्ये पाणी साचल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होताच अमरावती महानगरपालिकेने तात्काळ कार्यवाही करत नागरिकांना दिलासा दिला. महापालिका आयुक्त वर्षा लड्डा आणि महापौर श्रीचंद तेजवानी यांनी स्वतः रस्त्यावर उतरून परिस्थितीची पाहणी केली व संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या.महानगरपालिकेच्या स्वच्छता, अग्निशमन आणि इतर विभागांनी समन्वय साधून पाणी उपसा व निचऱ्याची कामे वेगाने सुरू केली. चौधरी चौक परिसरात पाणी साचल्याच्या तक्रारीनंतर महापौर श्रीचंद तेजवानी व आयुक्त वर्षा लड्डा यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पंजाबराव तायवाडे उपस्थित होते.गांधी चौकातील दत्त पॅलेस व अग्रवाल प्लाझा परिसरातील दुकानांमध्ये पाणी शिरल्याच्या तक्रारींनंतर आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते कामांदरम्यान पुरेशी जलनिस्सारण व्यवस्था करण्यात आली नसल्याचे



निदर्शनास आल्याने संबंधित यंत्रणेला तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक मिलिंद बांबल, नगरसेविका लविना हर्षे, चंद्रशेखर कुलकर्णी व विशाल कुलकर्णी उपस्थित होते.यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालय परिसराची पाहणी करण्यात आली. रिटर्न पाण्यामुळे परिसरात साचलेल्या पाण्याचा अग्निशमन विभागाने आपत्कालीन पंपाच्या साहाय्याने तातडीने उपसा करून परिस्थिती नियंत्रणात आणली.नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अमरावती महानगरपालिका पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पूर्णतः सज्ज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जिल्ह्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी मनाई

## ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी संपूर्ण साठा आरक्षित

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५ अमरावती**

मॉन्सूनला होत असलेला विलंब व हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर सिंचनासाठी आवर्तन देण्यास मनाई करण्यात आली आहे. सिंचन प्रकल्पातील सर्व पाणीसाठा पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे यंदा खरीप हंगामात सिंचनासाठी पाणी सोडण्यात येण्याची शक्यता मावळली आहे.

अमरावती जिल्ह्यात सिंचन प्रकल्पांत सद्यस्थितीत ३९ टक्के जलसाठा शिल्लक आहे. एल निनोच्या परिणामामुळे पावसावर होणारा प्रतिकूल परिणाम लक्षात घेता राज्य शासनाने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेला प्राधान्य दिले आहे. ३१ ऑगस्टपर्यंत शहरी व ग्रामीण भागात अखंडित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी धरणांमधील उपलब्ध जलसाठ्यास सिंचनासाठी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदा मॉन्सूनची वाटचाल बघता पाणीटंचाईची शक्यता वाढली आहे. भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून महसूल, जलसंपदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजण्यास सांगण्यात आले आहे. शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी आणि जलसंपदा विभागाच्या



अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सिंचन प्रकल्प व जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा, तसेच धरणांमधून सिंचनासाठी प्रस्तावित किंवा सुरू असलेली पाणी आवर्तने तात्काळ बंद करण्यात यावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवलेल्या जलसाठ्याचा अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करता येणार नाही. ३१ ऑगस्टपर्यंत आवश्यक त्याप्रमाणात पाणी राखीव ठेवून त्याचा काटेकोर वापर करण्यासाठी जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# खारपाणपट्ट्यातला नदीजोड प्रकल्प मंजूर करा

## मुख्यमंत्री, केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांकडे मागणी –खासदार अनिल बोंडे यांचा पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

दर्यापूर तालुक्यासह संपूर्ण विधानसभा क्षेत्रातील खारपाणपट्ट्यातील शेतीला संकटातून बाहेर काढण्यासाठी 'पूर्णा–चंद्रभागा, भुलेश्वरी–सापन, शहानूर नदीजोड प्रकल्प' तातडीने मंजूर करावा, अशी मागणी राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शासन दरबारी केली आहे. या संदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री यांना स्वतंत्र पत्रे पाठवून या प्रकल्पाचा 'राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पांतर्गत' समावेश करण्याची मागणी केली आहे.

दर्यापूर परिसरातील तब्बल ९० टक्के शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. शाश्वत सिंचनाच्या अभावामुळे येथील अडचणींचा सामना करावा लागतो. यावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी कोरडवाहू जमिनीला बारमाही शाश्वत पाणी देणे हाच एकमेव दीर्घकालीन उपाय आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास सध्या ओस पडलेल्या नद्या बारमाही वाहत्या राहतील. परिणामी, परिसरातील नापीक होत चाललेली जमीन पुन्हा सुपीक होईल आणि शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट होऊन रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबेल, असा विश्वास खासदार डॉ. बोंडे यांनी पत्रात व्यक्त केला आहे.

सध्या ओस पडलेल्या नद्या वर्षभर वाहत्या राहतील. खारटपणामुळे नापीक झालेली जमीन पुन्हा सुपीक बनेल. शेतकर्यांना रब्बी आणि उन्हाळी पिके घेणे शक्य होईल. आर्थिक सुबत्तेने ग्रामीण भागातील स्थलांतर थांबेल. या नदीजोड प्रकल्पामुळे तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असल्याने संपूर्ण दर्यापूर मतदार संघातून आणि शेतकरी वर्गातून खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या या देशपातळीवरील प्रयत्नांचे जोरदार स्वागत केले जात आहे.

> दर्यापूर परिसरातील ८५ ते ९० टक्के शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. सिंचनाच्या अभावामुळे शेतकर्याला अडचणी येतात. यावर मात करण्यासाठी बारमाही शाश्वत पाणी देणे हा दीर्घकालीन उपाय आहे. यासाठीच 'पूर्णा–चंद्रभागा, भुलेश्वरी–सापन, शहानूर नदीजोड प्रकल्प' होणे अत्यंत आवश्यक आहे. ओस पडलेल्या नद्या बारमाही वाहत्या राहतील, नापीक जमीन सुपीक होईल आणि शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट होऊन स्थलांतर थांबेल. मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री यांच्याकडे 'राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पांतर्गत' तातडीने मंजुरी व निधी देण्याची मागणी केली आहे.
>
> 
>
> **डॉ.अनिल बोंडे, राज्यसभा खासदार**


# बालभारती झुकली; मात्र पुन्हा भाषिक खोडी

## फुले दांपत्याचा थेट उल्लेख टाळला –अधिकृत शुद्धिपत्रक निर्गमित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

पाठ्यपुस्तक मंडळाच्या संचालिका अनुराधा ओक यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या अधिकृत पत्रानुसार इयत्ता तिसरीच्या 'आपल्या सभोवतालचे जग भाग २' या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १५ वरील 'माहित आहे का तुम्हांला?' या चौकटीत आता अधिकृत बदल करण्यात आला आहे. पाठ्यपुस्तकातील जुने वाक्य 'ही महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा होय' हे पूर्णपणे बदलून आता तिथे ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिली मुलींची शाळा होय. ही भारतीयांनी मुलींसाठी स्थापन केलेली पहिलीच शाळा होय. असा नवीन मजकूर समाविष्ट केला आहे. या नवीन वाक्याच्या औचित्यावर बोट ठेवत प्रहार शिक्षक संघटनेने तीव्र आक्षेप घेतला आहे. ही शाळा कोणी सुरू केली, याचे उत्तर अख्ख्या जगाला माहीत असताना, तिथे 'क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करणे बालभारतीला का डाचत आहे? 'भारतीयांनी' या व्यापक शब्दाच्या आडोश्याखाली मूळ महापुरुषांचे नाव जाणीवपूर्वक अदृश्य किंवा मर्यादित करण्याचा हा प्रशासकीय घाट तर नाही ना? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे.

हा केवळ एका शब्दाचा बदल नसून देशातील स्त्री शिक्षणाच्या खर्या आणि जाज्वल्य इतिहासाचा विजय आहे, अशी भावना प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. ते




म्हणाले, राष्ट्रपुरुषांच्या आणि राष्ट्रमातांच्या जागतिक कार्याचा संकोच करणारी कोणतीही चूक आम्ही खपवून घेणार नव्हतो. बालभारतीने आमचे निवेदन गांभीर्याने घेऊन तात्काळ दुरुस्ती केली आणि २४ तासांत हे शुद्धिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले, ही समाधानाची बाब आहे.

या गंभीर भाषिक आणि वैचारिक चुकीवर प्रहार शिक्षक संघटनेने आपली स्पष्ट आणि आक्रमक भूमिका मांडली आहे. पहिली शाळा 'भारतातली' आहे हे मान्य करायला आम्ही बालभारतीला भाग पाडले, हा आमच्या पाठपुराव्याचा विजय आहे. परंतु, दुरुस्ती करताना 'फुले दाम्पत्याचे' नाव डावलून केवळ 'भारतीयांनी' असा मोघम उल्लेख करणे म्हणजे इतिहासाचे सामान्यकरण करून मूळ क्रांतीच्या जनकांचे श्रेय कमी करण्यासारखे आहे. बालभारतीने या वाक्यात सुधारणा करून तिथे 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी...' असाच स्पष्ट आणि स्वाभिमानी उल्लेख समाविष्ट केला पाहिजे. इतिहासाशी अशी अर्धवट तडजोड प्रहार शिक्षक संघटना कधीही खपवून घेणार नाही, अशी ठाम मागणी महेश ठाकरे यांनी केली आहे.

# 'ब' दर्जा मिळूनही संत गुलाबराव महाराज संस्थान विकासापासून दूर

## लोणी टाकळी येथे संतांच्या नावाने स्वतंत्र विकास आराखड्याची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५ लोणी–** प्रज्ञाचक्षू, ज्ञानेशकन्या म्हणून ओळखले जाणारे संत गुलाबराव महाराज यांच्या जन्मभूमी असलेल्या लोणी टाकळी येथील संस्थानाला शासनाचा 'ब' दर्जा प्राप्त आहे. मात्र अपेक्षित विकास झालेला नसल्याने ग्रामस्थ व भाविकांमध्ये नाराजी आहे. संतांच्या जन्मस्थळावरील मंदिर परिसराचा जीर्णोद्धार, सुशोभीकरण, भाविकांसाठी सुविधा आणि तीर्थक्षेत्र विकास आराखडा तातडीने मंजूर करण्याची मागणी होत आहे. संतांच्या राहत्या घराचा जीर्णोद्धार करून 'संत गुलाबराव महाराज विकास आराखडा' मंजूर करावा, तसेच संतांच्या स्मृती जतन करण्यासाठी सुमारे दहा एकर जागेवर 'गुलाब वाटिका' प्रकल्प उभारण्याचाही प्रस्ताव पुढे आला आहे. या प्रकल्पात संत साहित्य अभ्यास केंद्र, ध्यानधारणा केंद्र, वाचनालय, उद्यान आणि भाविकांसाठी विविध सुविधा उभारण्याचा मानस आहे. या मागण्यांसाठी विनय देशमुख, दीपक बोबडे, अशोक सवाई, किशोर राऊत, गोरखनाथ कडू, सचिन गायगोल, जितेंद्र शिंदे आणि प्रवीण सवाई शासनस्तरावर पाठपुरावा करीत आहेत. संतांचे कार्य जागतिक स्तरावर पोहोचले असताना त्यांच्या जन्मभूमीचाही सर्वांगीण विकास व्हावा, अशी अपेक्षा भाविकांनी व्यक्त केली आहे. राज्य शासनाने संत गुलाबराव महाराजांची जयंती राज्यभर शासकीय स्तरावर साजरी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर श्रीक्षेत्र लोणी टाकळी चर्चेत आले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ जुलै २०२६ रोजी संतांच्या जन्मभूमीला भेट देण्याची शक्यता व्यक्त होत आहे. संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहिमेचे प्रमुख माधुर्य ठाकरे यांनी नुकत्याच मंत्रालयात झालेल्या चर्चेत संतांचे साहित्य, तत्त्वज्ञान आणि राज्यस्तरीय जयंती उत्सवाबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाल्याची माहिती दिली. मुख्यमंत्र्यांचा दौरा निश्चित झाल्यास श्रीक्षेत्र लोणी टाकळीच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# मोजक्याच कोचिंग क्लासेसकडून नियमांचे पालन

# अमरावतीतही फायर ऑडिटला 'खो'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

लखनौमधील अग्नितंडवात १५ जणांचा मृत्यु झाल्याची घटना समोर आली असून त्यामध्ये बहुतांश विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमरावती शहरातही तशाच पद्धतीचा धोका कायम आहे. केवळ चार ते पाच नामांकित कोचिंग समूह वगळता अन्य लहान कोचिंगसेंटर्स कडून फायर आडिटच करण्यात आले नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.उत्तरप्रदेशच्या लखनौ येथील तीन मजली इमारतीला सोमवारी भीषण आग लागून १५ जणांचा मृत्यु झाला होता. त्यामध्ये बहुतांश विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ज्या इमारतीमध्ये अग्नीतांडव झाले त्या इमारतीमध्ये प्रशिक्षण संस्थांचाही समावेश होता. अमरावती शहरात सुद्धा अनेक ठिकाणी लहान मोठी कोचिंग क्लासेस व प्रशिक्षण संस्था सुरु आहेत. त्यापैकी बहुतांश संस्था या इमारतींमध्ये आहे. बहुतांश संस्थांकडून अद्यापही फायर आडिट करण्यात आले नसल्याची बाब समोर आली आहे, मात्र काही कोचिंग तसेच प्रशिक्षण संस्था या




बहुमजली इमारतीमध्ये असून इमारत निर्मितीच्या वेळीच त्याचे फायर आडिट केले जाते, त्यामुळे अशा संस्थांना स्वतंत्रपणे फायर आडिटची आवश्यकता नसल्याचे अग्निशामक विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु अनेक संस्थांच्या स्वतःची इमारती आहे, मात्र त्यांचे फायर आडिट करण्याबाबत अग्निशामक विभागाकडे कुठलीही मागणी करण्यात आली नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात अमरावती मनपाच्या अग्निशमन विभागाचे अधीक्षक अजय पंधरे म्हणाले की, अमरावती शहरातील मोजक्या, नामांकित कोचिंग संस्थांकडून वेळोवेळी फायर आडिटची प्रक्रिया पूर्ण केली जाते, मात्र अनेक संस्थांकडून अद्यापही फायर ऑडिटची मागणी आमच्याकडे करण्यात आलेली नाही. मल्टिप्लेक्स किंवा कॉम्पलेक्स निर्मिती करतानाच फायर ऑडिट केले जाते. त्याशिवाय परवानगी दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले.

# स्मार्ट मीटरबाबत गैरसमज दूर करण्यासाठी ३० जूनला ग्राहक मेळावे, ४२ उपविभागांत आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

महावितरणच्या अमरावती परिमंडळात स्मार्ट (टिओडी) मीटरबाबत वीज ग्राहकांमध्ये असलेले गैरसमज दूर करण्यासाठी तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने येत्या ३० जून रोजी उपविभागनिहाय ग्राहक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ४२ उपविभागांमध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे मेळावे होणार आहेत.महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्मार्ट (टिओडी) मीटर हे पूर्णतः अचूक असून सामान्य वीज ग्राहकांसाठी फायदेशीर आहेत. या मीटरमुळे दिवसा वीज वापरावर प्रति युनिट ८५ पैशांची सवलत मिळते. औद्योगिक ग्राहकांकडे अनेक वर्षांपासून अशा प्रकारचे मीटर वापरात असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता मेळाव्यांना उपस्थित राहून वस्तुस्थिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.मेळाव्यांमध्ये स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, फायदे, वैशिष्ट्ये आणि अचूकतेबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. तसेच स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढल्याच्या तक्रारींची तपासणी करून संबंधित ग्राहकांना मार्गदर्शन व आवश्यक ती कार्यवाही केली जाणार आहे. उपविभाग प्रमुख आणि कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून ग्राहकांच्या शंकांचे निरसन करतील.महावितरणच्या माहितीनुसार, स्मार्ट मीटरची माहिती मिळाल्यानंतर अनेक ग्राहकांनी स्वेच्छेने स्मार्ट मीटर बसविण्यासाठी अर्ज केले आहेत. अमरावती परिमंडळात



आतापर्यंत ३ लाख ९८ हजार ४४० स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्यात आले असून त्यात अमरावती जिल्ह्यातील २ लाख ३८ हजार १८२ आणि यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ६० हजार २५८ ग्राहकांचा समावेश आहे.याशिवाय स्मार्ट मीटर अथवा वाढीव वीजबिलांबाबतच्या तक्रारी महावितरणचे संकेतस्थळ, मोबाईल ॲप तसेच १९१२, १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल-फ्री क्रमांकांवर नोंदविता येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

# नेत्यांचे पाहणी, दौरे आणि निर्देशांचा पाऊस कायमस्वरूपी उपाययोजनांची मात्र प्रतीक्षा



## केवळ पाहणी, दौरे आणि निर्देश देऊन प्रश्न सुटणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** – बुधवारी दुपारनंतर अमरावती शहरात झालेल्या धुवांधार पावसाने संपूर्ण शहर अक्षरशः जलमय झाले. अवघ्या काही तासांच्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक प्रमुख रस्ते, चौक, शासकीय कार्यालये आणि व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये पावसाचे पाणी शिरले. पाणी निचऱ्याची अपुरी व्यवस्था, बंद पडलेल्या नाल्या आणि नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) परिसरात पावसाचे पाणी शिरल्याने रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह वैद्यकीय कर्मचाऱ्यांचीही तारांबळ उडाली. आपत्कालीन कक्षाजवळ पाणी साचल्याने रुग्णसेवेवर परिणाम झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. जिल्हा परिषद कार्यालय परिसरासह अनेक शासकीय इमारतींमध्येही पाणी शिरल्यामुळे कामकाजावर परिणाम झाला.याशिवाय शहरातील अनेक दुकाने, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि घरांमध्ये पावसाचे पाणी घुसल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. अनेक भागांत रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली. काही ठिकाणी वाहनचालकांना वाहन ढकलत नेण्याची वेळ आली, तर नागरिकांना पाण्यातून मार्ग काढावा लागला.दरवर्षी पावसाळ्यात अशाच प्रकारच्या समस्या उद्भवत असतानाही संबंधित यंत्रणांकडून कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. नालेसफाई, पाणी निचरा व्यवस्था आणि शहर नियोजनाबाबत वारंवार प्रश्न उपस्थित होत असतानाही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा दिसून येत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.पावसानंतर



गुरुवारी विविध लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी बाधित भागांची पाहणी सुरू केली. खासदार बळवंत वानखडे तथा आमदार रवी राणा यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. महापालिका आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारीही विविध भागांत जाऊन पाहणी करत असल्याचे दिसून आले.मात्र नागरिकांच्या मते, केवळ पाहणी, दौरे आणि निर्देश देऊन प्रश्न सुटत नाहीत. प्रत्येक वर्षी पावसानंतर अशाच भेटी आणि आढावा बैठका घेतल्या जातात; परंतु प्रत्यक्षात कायमस्वरूपी उपाययोजना आणि जबाबदारी निश्चित होत नसल्याने समस्या कायम राहतात. शहरातील पाणी साचणाऱ्या ठिकाणांचे सर्वेक्षण, आधुनिक जलनिस्सारण व्यवस्था, नियमित नालेसफाई आणि दीर्घकालीन नियोजनाची अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.बुधवारच्या पावसाने अमरावतीच्या नागरी व्यवस्थापनासमोरील अनेक त्रुटी पुन्हा एकदा उघड केल्या आहेत. त्यामुळे आता केवळ पाहणी आणि आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती करून शहराला जलमय होण्यापासून वाचविण्यासाठी ठोस पावले उचलली जातात का, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

# डायव्हर्शन रस्त्याच्या दुरवस्थेमुळे भारवाडीकरांचा संताप

## नागरिकांच्या आक्रमक भूमिकेनंतर रस्त्याची दुरुस्ती

.विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५तिवसा** – तिवसा तालुक्यातील भारवाडी (जुनी) येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुमारे २ किलोमीटर रस्त्याचे तसेच दोन पुलांच्या बांधकामाचे काम सुरू आहे. पुलांचे काम सुरू असल्याने वाहतुकीसाठी पर्यायी (डायव्हर्शन) रस्ता उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, या रस्त्याची योग्य देखभाल न केल्याने ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या महिनाभरापासून डायव्हर्शन रस्त्यावर मुरूम टाकून तो वाहतुकीयोग्य करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित कंत्राटदाराकडे वारंवार करण्यात आली होती. मात्र, या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान बुधवार रोजी झालेल्या



मुसळधार पावसानंतर डायव्हर्शन रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला आणि वाहतुकीसाठी अयोग्य ठरला.यामुळे शालेय विद्यार्थी, रुग्ण, तिवसा बाजारपेठेत जाणारे नागरिक तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. भारवाडी येथे आरोग्य केंद्र नसल्याने उपचारासाठी बाहेर जावे लागते. तसेच शिक्षण, बाजारपेठ आणि इतर आवश्यक कामांसाठी हा एकमेव मार्ग असल्याने रस्त्याच्या दुरवस्थेचा फटका संपूर्ण गावाला बसला. परिस्थिती इतकी गंभीर झाली की एका लग्नाची वरातही गावातच अडकून पडल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.या प्रकारामुळे माजी सरपंच सचिन राऊत यांनी संबंधित कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत तातडीने रस्ता दुरुस्त करण्याचा इशारा दिला. त्याचबरोबर त्यांनी व ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांच्या आणि कंत्राटदाराच्या हलगर्जीपणाविरोधात सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसिद्ध केला. या व्हिडिओची व्यापक चर्चा होताच प्रशासन व कंत्राटदार यांनी तातडीने दखल घेत रात्रोरात डायव्हर्शन रस्त्याची दुरुस्ती करून आवश्यक मुरूम टाकण्याचे काम पूर्ण केले.सकाळपर्यंत रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला. त्यामुळे अडकलेली लग्नाची वरातही मार्गस्थ झाली आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला.दरम्यान, या घटनेमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात पावसाळ्यात अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये यासाठी डायव्हर्शन रस्त्याची नियमित देखभाल करून तो कायम सुरक्षित व वाहतुकीयोग्य ठेवावा, अशी मागणी भारवाडी येथील नागरिकांनी केली आहे.


# २८ जून रोजी सर्व ० ते ५ वर्षांच्या बालकांना पोलिओचे दोन थेंब द्या


## डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती**

भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण दिन (छखऊ) अंतर्गत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्यात येणार असून पालकांनी आपल्या पाल्यांना जवळच्या पोलिओ बूथवर घेऊन जाऊन लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.भारताला






२०१४ मध्ये पोलिओमुक्त घोषित करण्यात आले असले तरी जगातील काही देशांमध्ये अद्याप पोलिओ विषाणूचे अस्तित्व असल्याने सतर्कता राखणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर ही मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक बालकापर्यंत पोलिओची लस पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शहरी आरोग्य केंद्रे, पोलिओ बूथ तसेच विशेष पथकांच्या माध्यमातून लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. २८ जून रोजी बूथवर लसीकरण झाल्यानंतर पुढील काही दिवस आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन राहिलेल्या बालकांना पोलिओचे डोस देणार आहेत. स्थलांतरित वस्ती, झोपडपट्ट्या आणि उच्च जोखीम क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, बालकाने यापूर्वी नियमित लसीकरणातील सर्व पोलिओ डोस घेतले असले तरी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेतील डोस घेणे तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे कोणतेही बालक या मोहिमेपासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी सहकार्य करावे.दोन थेंब जीवनाचे – प्रत्येक बालकासाठी या घोषवाक्याखाली राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून अमरावती शहर पोलिओमुक्त राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. विशाल काळे तसेच अमरावती महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आले आहे.

# अभ्यासिकेसाठी १.१२ कोटींचे भाडे

## अनियमिततेवर अधिवेशनात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

अमरावती येथे आदिवासी विकास विभागाची सुसज्ज शासकीय अभ्यासिका इमारत तयार असतानाही खाजगी मॉलमध्ये अभ्यासिका भाड्याने घेऊन शासनाचे तब्बल १ कोटी १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा मुद्दा आज राज्य विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात गाजला. आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी लक्षवेधीद्वारे हा विषय उपस्थित करत आदिवासी प्रकल्प विभागातील अनियमितता आणि कथित भ्रष्टाचारावर जोरदार टीका केली.आ. खोडके यांनी सभागृहात सांगितले की, अमरावतीच्या गाडगेनगर परिसरात सुमारे १ कोटी १९ लाख रुपयांच्या निधीतून विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुसज्ज अभ्यासिका इमारत उभारण्यात आली होती. ही इमारत




डिसेंबर २०२४ मध्ये पूर्ण झाल्यानंतरही तिचा वापर न करता राजकमल चौकातील एका खाजगी मॉलमध्ये दरमहा ८ लाख ६८३ रुपये भाड्याने अभ्यासिका चालविण्यात आली. यामुळे १४ महिन्यांत शासनाला १ कोटी १२ लाख रुपयांचा आर्थिक फटका बसल्याचा आरोप त्यांनी केला.भाडे करार करताना वित्त विभागाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा तसेच भाडे निश्चिती प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला. विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प असतानाही २०२८ पर्यंतचा दीर्घकालीन करार करण्यात आल्याने शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचे त्यांनी नमूद केले.यावर उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी प्रकरणात अनियमितता झाल्याचे मान्य केले. चौकशी समितीच्या अहवालात गंभीर त्रुटी आढळल्याचे सांगत शासकीय आदिवासी वसतिगृहाचे गृहप्रमुख व गृहपाल यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी सभागृहात केली. तसेच पुढील चौकशीत इतर अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

# धामणगाव मतदार संघांत जन कल्याण शिबिराला सुरुवात

## आमदार प्रतापदादा अडसड यांची संकल्पनाशेकडो तक्रारी निकाली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५धामणगाव रेल्वे**

विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या विविध शासकीय योजना, तक्रारी आणि समस्यांचे तातडीने निराकरण व्हावे तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने आमदार प्रतापदादा अडसड यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या जन कल्याण योजनेतून शेकडो ग्रामस्थांच्या तक्रारी निकालात निघत आहे.

मंगरूळ दस्तगीर, लोणी टाकळी, आमला विश्वेश्वर शेदुरजना, खुर्द येथे पहिल्या टप्प्यात हे शिबिर घेण्यात आले.राज्य व केंद्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात




आली. विविध योजनांसाठी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, पात्रता निकष तसेच शासकीय सेवांचा लाभ कसा मिळवावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनेक नागरिकांच्या प्रलंबित समस्या व तक्रारींची नोंद घेऊन त्यावर कार्यवाहीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. शासकीय विभागांच्या विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या योजना आणि सेवा थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम प्रभावी ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी जनकल्याण शिबिराचेप्रमुख पाहुणे धामणगाव रेल्वे विधानसभा भाजपा निवडणूक प्रमुख रावसाहेब रोठे, तसेच मंगरूळ दस्तगीरचे सरपंच सतीश हजारे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष कृष्णा मारोडकर, मंगेश मारोडकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रवि भुतडा, बाबा ठाकूर, भाजपा तालुका अध्यक्ष बबलू खैरकार, प्रणय राजनकर, भाजपा महिला आघाडी अध्यक्षा मालु रंगारी, माधुरी भोंगे, उमेश भुजाडणे, अरुण मडावी, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष पवन पडोळे, राहुल चौधरी यांच्यासह अनेक उपस्थित होते.

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि शासनाच्या योजना घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, या उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# मेळघाटातून मुक्त झालेल्या ‘त्या’ गिधाडाची ३,३३४ किमी भरारी

## २७ दिवसांत तीन राज्य ओलांडून थेट रणथंबोर गाठलं!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ मेळघाट**

नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या गिधाडांच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून यंदा जानेवारीत मुक्त करण्यात आलेल्या लांब चोचीच्या गिधाडाने तब्बल ३,३३४ किलोमीटरचा प्रवास करत राजस्थानातील रणथंबोर व्याघ्रप्रकल्प गाठला. या प्रवासात या गिधाडाने मध्य प्रदेशातील सातपुडा व्याघ्रप्रकल्प आणि कुनो राष्ट्रीय उद्यानाला देखील भेट दिली.


### गिधाडाचा प्रवास आणि तंत्रज्ञानाचा फायदा

‘एक्स-६७’ क्रमांकाची हे पाच वर्षांचे मादी गिधाड २ जानेवारीला मेळघाटातील सोमठाणा परिक्षेत्रातून मुक्त करण्यात आलेल्या १५ बंदिस्त प्रजननातून वाढविलेल्या गिधाडांपैकी एक आहे. मुक्त केल्यानंतर सुमारे चार महिने ती मेळघाट परिसरातच भक्ष्य शोधत राहिली आणि नैसर्गिक वातावरणाशी तिने जुळवून घेतले. या सर्व १५ गिधाडांच्या पायाला निळ्या रंगाच्या ओळख कड्या लावण्यात आल्या आहेत. निळा रंग भारतातील रिंगिंग दर्शवतो, तर ‘एम’ हे अक्षर महाराष्ट्रातील मुक्तता स्थळाचे संकेत देते. गिधाडांना सौरऊर्जेवर चालणारे ‘ट्रॅकिंग टॅग’ही बसवण्यात आले.

### गिधाड संवर्धनासाठी महत्त्वाचा टप्पा

‘ट्रॅकिंग ट्रॅक’ हे तंत्रज्ञान त्यांच्या हालचाली, प्रवासाचे अंतर, सुरक्षितता आणि अस्तित्वावर सतत लक्ष ठेवले जाते. बीएनएचएसचे क्षेत्रीय जीवशास्त्रज्ञ भास्कर दास आणि सूर्यजित हे उपवनसंरक्षक राहुल तोलिया यांच्या मार्गदर्शनाखाली या गिधाडांवर देखरेख करत आहेत. गिधाड संवर्धन कार्यक्रमासाठी ही घटना महत्त्वाचा टप्पा मानली जात असून बंदिस्त प्रजननातून वाढवलेल्या गिधाडांच्या पुनर्स्थापना उपक्रमांना यामुळे नवी दिशा मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

२८ मे रोजी ‘एक्स-६७’ या मादी गिधाडाने मेळघाट सोडले आणि मध्य भारतातील दीर्घ प्रवासाला सुरुवात केली. महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि राजस्थान असा प्रवास करत तिने २७ दिवसात ३,३३४ किलोमीटर



अंतर कापले. या काळात तिने सातपुडा, भोपाळ परिसर आणि कुनो राष्ट्रीय उद्यानात तात्पुरता मुक्काम केला, असे बॉम्बे नॅचरल सोसायटीचे वरिष्ठ क्षेत्रीय जीवशास्त्रज्ञ भास्कर दास यांनी सांगितले.

### नैसर्गिक अधिवासात तग धरण्याची क्षमता सिद्ध

‘एक्स-६७’ या मादी गिधाडाने कोणत्याही पूरक खाद्यपुरवठ्याशिवाय यशस्वीपणे तग धरला. यावरून बंदिस्त प्रजननातून वाढलेली गिधाडे नैसर्गिक अधिवासात अन्न शोधू शकतात आणि दीर्घ अंतराचे स्थलांतरही करु शकतात, हे सिद्ध झाले. विशेष म्हणजे या गिधाडाने व्याघ्रप्रकल्प आणि संरक्षित क्षेत्रांच्या साखळीचा वापर केला. या भागात मांसाहरी प्राण्यांची उपस्थित असल्याने नैसर्गिक मृतभक्ष्य उपलब्ध राहते, असे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक किशोर रिठे यांनी सांगितले.